## ॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

### अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

**ओवी :** **ओवी क्रमांक १**

**श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥ श्रीगुरुभ्यो नमः ॥**

**नामधारक म्हणे सिद्धासी। पुढें अवतार जाहले कैसी।**

**विस्तारोनियां आम्हांसी। सांगा स्वामी कृपामूर्ति ॥ १ ॥**

**गद्यरुप :-**

मी श्रीगणेशाला नमस्कार करतो. मी श्रीसरस्वतीला नमस्कार करतो. मी श्रीगुरुंना करतो. नामधारक (भक्त) सिद्ध(मूनीं)ना म्हणाला, "पुढे अवतार कसे झाले ? हे स्वामी कृपामूर्ति, विस्तार करुन आम्हाला सांगा."

**शब्दार्थ :-**

| |
|---|
| झाले = बोली भाषेत जाहले |
| कैसा = कसा ? कसला ? |

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

**ओवी :** **ओवी क्रमांक २**

सिद्ध म्हणे ऐक वत्सा। अवतार झाला श्रीपाद हर्षा।
पूर्वी ऐकिला ऐसा। कथा सांगितली विप्रस्त्रियेची॥ २॥

**गद्यरुप :-**

सिद्धमूनी म्हणाले,”श्रीपाद अवतार झाला,(तसेच) त्या अवतारातील (अध्याय ८) सांगितलेली ब्राह्मणस्त्रीची कथा, तू पूर्वी जशी अतिशय आनंदाने ऐकलीस, (त्याचप्रकारे) हे बालका, ऐक.”

**शब्दार्थ :-**

| | | |
|---|---|---|
| वत्स= बालक मूल | हर्ष =अतिशय आनंद | विप्र= ब्राह्मण |

॥ श्रीगुरुचरित्र निधी॥

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

ओवी : ओवी क्रमांक ३

शनिप्रदोषीं सर्वेश्वरासी। पूजित होती गुरु-उपदेशीं।
देहवासना असतां तियेसी। पंचत्व पावली तयेवेळीं॥ ३ ॥

**गद्यरुप :-**

तिला देहाची आसक्ती असताना, शनि प्रदोषाच्या दिवशी, गुरुच्या उपदेशाप्रमाणे, ती (अध्याय ८ मधील-ब्राह्मणस्त्री) महादेवास पूजत होती. त्यावेळी ती मृत्यू पावली.

शब्दार्थ :-

| |
|---|
| सर्वेश्वर = परमेश्वर, महादेव<br>श्रीशंकराची पूजा शनिप्रदोषाच्या दिवशी करतात, त्यामुळे या ठिकाणी सर्वेश्वर म्हणजे महादेव होय. |
| वासना= आवड (देहाची आवड म्हणजे देहाविषयी आसक्ती) |
| पंचत्व पावणे =देहातील पाच मुख्य तत्त्वे (पृथ्वी, अप/आप= पाणी, तेज(अग्नि), वायू आणि आकाश) निरनिराळी होणे म्हणजे मरण पावणे. |

॥ श्रीगुरुचरित्र निधी॥

## अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

**ओवी :** **ओवी क्रमांक ४**

झाला जन्म पुढें तिसी। कारंज-नगरउत्तरदेशीं।
वाजसनीय शाखेसी। विप्रकुळीं जन्मली॥ ४॥

**गद्यरुप :-**

पुढे तिचा उत्तरेकडील मुलूखातील कारंज नगरात जन्म झाला. वाजसनीय शाखेच्या ब्राह्मण कुळात (ती) जन्मली.

**शब्दार्थ :-**

| | |
|---|---|
| देश= मुलूख, प्रांत | विप्र=ब्राह्मण |
| कारंज नगर म्हणजे विदर्भातील जिल्हा अकोला येथील, सध्याचे कारंजा हे गाव. या गांवाला लाड कारंजा असेही म्हणतात, हे क्षेत्र उत्तरेकडील गाणगापूर मानले जाते. काशी येथील पंचगंगेश्वर मठाधिपती श्री. ब्रह्मानंद सरस्वती उर्फ लीलादत्त स्वामी महाराजांनी इसवी सन १८५६मध्ये सुंदर देवालय बांधून 'श्रीनृसिंह सरस्वती' मूर्तीची स्थापना केलेली आहे. | |

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

**ओवी :** **ओवी क्रमांक ५**

जातक वर्तलें तियेसी। नाम 'अंबाभवानी' ऐसी।
आरोपिलें स्नेहेसीं। मातापितरीं परियेसा॥५॥

**गद्यरुप :-**

तिच्या जन्मकुंडलीनुसार तिचे नाव 'अंबाभवानी' असे ठेवले. मातापित्याने प्रेमाने हे रोप लावले (तिला प्रेमाने वाढविले), हे ऐका.

**शब्दार्थ :-**

| | |
|---|---|
| जातक= जन्मकाळाच्या ग्रहांच्या स्थितीवरून माणसाच्या आयुष्यात घडणाऱ्या शुभाशुभ गोष्टींविषयींचे वर्णन करणारा ज्योतिषशास्त्राचा एक विषय | |
| वर्तविणे =ग्रह इ.च्या गतीसंबंधाचे गणित करणे | |
| आरोप= रोप लावणे | स्नेह= प्रेम |
| पितर (शाकुंतल निर्णयसागर शके १८१२)= पितृ =बाप | परियसणे= ऐकणे |

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

**ओवी :** **ओवी क्रमांक ६**

वर्धतां मातापित्यागृहीं। वाढली कन्या अतिस्नेही।
विवाह करिती महोत्साहीं। देती विप्रासी तेंचि ग्रामीं॥ ६ ॥

**गद्यरुप :-**

मातापित्याच्या घरी मोठी होत असताना, ही कन्या अतिशय प्रेमात वाढली. त्यांनी तिचा विवाह मोठ्या उत्साहात केला. तिला त्याच गावातील ब्राह्मणाला दिले.

**शब्दार्थ :-**

| | | |
|---|---|---|
| वर्धणे= वाढणे | गृह= घर | स्नेह=प्रेम |
| महोत्साह= महा+ उत्साह | विप्र=ब्राह्मण | ग्राम= गाव |

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

**ओवी :** **ओवी क्रमांक ७**

शिवव्रती असे तो ब्राह्मण। नाम तया 'माधव' जाण।
त्यासी दिधली कन्या दान। अतिप्रीतींकरूनि॥७॥

**गद्यरुप :-**

शिवावर निष्ठा असलेल्या त्या ब्राह्मणाचे नाव 'माधव' होते, हे जाण. अतिशय प्रेमाने दान करून तिच्या मातापित्यानी त्याला कन्या दिली.

**शब्दार्थ :-**

| |
|---|
| व्रतः= निष्ठा |

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

ओवी : ओवी क्रमांक ८

तया माधवविप्राघरीं। शुभाचारें होती नारी।
वासना तिची पूर्वापरीं। ईश्वरपूजा करीतसे॥८॥

गद्यरुप :-

त्या माधव ब्राह्मणाच्या घरी ती स्त्री मंगलरुप रीतीने रहात होती. तिच्या मागच्या जन्मातील मनावर राहिलेल्या संस्काराप्रमाणे, ती ईश्वराची (श्रीशंकराची पूजा) करीत असे.

शब्दार्थ :-

| | |
|---|---|
| विप्र=ब्राह्मण | नारी= स्त्री |
| शुभाचार= शुभ(मंगलरुप) +आचार (वर्तन, चाल, रीत) | |
| पूर्व= मागले, पूर्वीचे | परी= प्रमाणे |
| वासना= कर्माचा मनावर रहाणारा संस्कार (ठसा अथवा अवशेष) | |

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

ओवी : ओवी क्रमांक ९

पूजा करी ईश्वरासी। दंपती उभयवर्ग मनोमानसीं।
प्रदोषपूजा अतिहर्षीं। करिती भक्तिपुरस्कर॥९॥

**गद्यरुप :-**

उभय पतीपत्नी मनोमनी (मनोभावे) ईश्वराची (श्रीशंकराची) पूजा करीत असत. प्रदोषपूजा अतिशय आनंदाने भक्तीचा स्वीकार करुन (भक्तीपूर्वक) करीत असत.

**शब्दार्थ :-**

| | | |
|---|---|---|
| दंपती= नवराबायको | उभय= दोघे | वर्ग= सजातीय वस्तूंचा समूह |
| मानस=मन | हर्ष= अतिशय आनंद | पुरस्कर= पुरस् (स्वीकार) + कर |

## ॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

### अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

**ओवी :** **ओवी क्रमांक १०**

मंदवारीं त्रयोदशीसी। पूजा करिती अतिविशेषीं।
तंव वत्सरें झालीं षोडशीं। अंतर्वत्नी झाली ऐका ॥ १० ॥

**गद्यरुप :-**

शनिवारी आलेल्या त्रयोदशीच्या दिवशी, अतिशय विशेष पूजा करीत असत. (असे आयुष्य चालू होते) तोपर्यंत मूले (पतीपत्नी) सोळा वर्षांची झाली. ती स्त्री गर्भिणी झाली (गरोदर राहिली) हे ऐका.

**शब्दार्थ :-**

| | | |
|---|---|---|
| मंद= शनिग्रह | तंव= तोपर्यंत | वत्स= मूल |
| षोडश= सोळा | अंतर्वत्नी =गर्भिणी | |

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

**ओवी :** **ओवी क्रमांक ११**

मास तृतीय-पंचमेसी।उत्साह करिती अनेक हर्षीं।
उत्तम डोहळे होती तियेसी।ब्रह्मज्ञान बोलतसे॥ ११ ॥

**गद्यरुप :-**

तिसऱ्या महिन्यापासून पुढचे पाच महिने (सातव्या महिन्यापर्यंत) अनेकप्रकारे उत्साह व्यक्त करीत, अतिशय आनंदात गेले. (सातवा महिन्यात) तिचे डोहळे उत्तम होते (तिच्या इच्छा उत्तम होत्या). ती ब्रह्मज्ञान (परमात्मा विषयीचे ज्ञान) बोलत असे.

**शब्दार्थ :-**

| | |
|---|---|
| हर्ष= अतिशय आनंद | डोहळा =गरोदर स्त्रीची इच्छा |
| ब्रह्मज्ञान= ब्रह्मविषयक ज्ञान | ब्रह्म= परमात्मा |

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

**ओवी :** **ओवी क्रमांक १२**

करिती उत्साह मास-सातीं। द्विज करी सीमंती।

अक्षवाणें वोंवाळिती आरती। सुवासिनी मिळूनियां॥ १२॥

**गद्यरुप :-**

सातव्या महिन्यात ब्राह्मणाने उत्साहात तिची सीमंती (गरोदर असलेल्या स्त्रीवरील संस्कार करणे) केली. (ब्राह्मणाने) सुवासिनी स्त्रीयांना ओवाळणीप्रित्यर्थ बक्षीस देऊन, त्यांच्याकडून गाणी म्हणत, तिला ओवाळून घेतले.

**शब्दार्थ :-**

| | |
|---|---|
| द्विज=ब्राह्मण | सीमंती= गर्भिणीचा एक संस्कार |
| अक्षवाण =ओवाळणी ओवाळणारास दिलेले बक्षीस | |
| आरती= ओवाळते वेळी म्हणण्याचे गीत | ओवाळिती बोली भाषेत वोवाळिती |
| ओवाळणे मंगलार्थ देवाच्या किंवा माणसाच्या मुखासमोर दिवा इत्यादि फिरवणे | |
| सुवासिनी= नवरा जिवंत असलेली स्त्री | |

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

**ओवी :** **ओवी क्रमांक १३**

ऐसें क्रमितां नवमासीं। प्रसूत झाली शुभ दिवशीं।
पुत्र जाहला म्हणून हर्षीं। निर्भर होतीं मातापिता॥ १३ ॥

**गद्यरुप :-**

अशाप्रकाराने तिला उत्साहात ठेवण्याच्या व्यवस्थेत, नऊ महिने संपले, एका शुभ दिवशी ती बाळंत झाली. मुलगा झाला म्हणून (बाळाचे) माता पिता अत्यानंदात (अतिशय अतिशय आनंदात) होते.

**शब्दार्थ :-**

| | | |
|---|---|---|
| क्रम =व्यवस्था | प्रसूत= बाळंत | पुत्र= मुलगा |
| हर्ष= अतिशय आनंद | निर्भर =अतिशय | |

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

**ओवी :** **ओवी क्रमांक १४**

जन्म होतांचि तो बाळक। 'ॐ' कार शब्द म्हणतसे अलोकिक।
पाहूनि झाले तटस्थ लोक। अभिनव म्हणोनि तयेवेळीं॥ १४ ॥

**गद्यरुप :-**

जन्म होताक्षणी तो बालक "ॐ" कार शब्द अनाकलनीय पद्धतीने म्हणाला. (भावार्थ: बालकाने ॐ कार हा शब्द कसा उच्चारला हे लोकांना समजले नाही) त्यावेळी 'नवीन घडले' असे म्हणून लोक (बालकाने जन्मताक्षणी ॐ कार शब्द म्हटला ह्या गोष्टीवर आपले कोणतेही मत न देता ) तटस्थ झाले.

**शब्दार्थ :-**

| | |
|---|---|
| अलोक= अदृश्य (अनाकलनीय) | अभिनव= नवीन |
| तटस्थ= कोणत्याही पक्षास न मिळालेला | |

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

**ओवी :** **ओवी क्रमांक १५**

जातककर्म करी ब्राह्मण। विप्रांसी देत दक्षिणा दान।
ज्योतिषी सांगती सुलक्षण। लग्न सत्वर पोहोनिया॥ १५॥

**गद्यरुप :-**

ब्राह्मणांना दक्षिणा दान देत, ब्राह्मणाने (बालकाच्या पित्याने) बालकाची जन्म पत्रिका बनवून घेण्याचे काम केले. ज्योतिषांनी लगेच लग्न पाहून (बालकाच्या जन्मवेळी असलेली राशी तिचा उदय व राशीचा काळ पाहून) पत्रिकेनुसार चांगले लक्षण आहे, हे सांगितले.

**शब्दार्थ :-**

| | | |
|---|---|---|
| जातक= पत्रिका | कर्म= काम | विप्र=ब्राह्मण |
| सुलक्षण= चांगले लक्षण | | सत्वर= त्वरेने |
| लग्न= राशीचा उदय व काळ | | |

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

ओवी : ओवी क्रमांक १६

सांगती ज्योतिषी त्या द्विजासी। मुहूर्त बरवा असे विशेषीं।
कुमर होईल कारणिक पुरुषी। गुरु होईल सकळिकां॥ १६ ॥

**गद्यरुप :-**

ज्योतिष्यांनी त्या ब्राह्मणास सांगितले,"मुहूर्त विशेष चांगला आहे. हे बाळ, सर्व मनुष्यांना घडविणारा गुरु होईल."

शब्दार्थ :-

| | | |
|---|---|---|
| द्विज=ब्राह्मण | बरवा= सुंदर छानदार | कुमर= बाळ |
| कारणिक= घडविणारा | पुरुष= मनुष्य | सकळिक= सर्व सगळे |

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

**ओवी :** **ओवी क्रमांक १७**

याचा अनुग्रह होईल ज्यासी। तो वंद्य होईल विश्वासी।
यांचे वाक्य होईल परिस। चिंतामणि याचे चरण॥ १७॥

**गद्यरुप :-**

याची कृपा ज्याच्यावर होईल, तो विश्वात वंदनीय असेल. ह्याचे वाक्य स्पर्शमणि होईल (लोकांना लोहचुंबकासारखे ह्याच्या बोलण्याकडे आकर्षित करील.) याचे पाय चिंतामणि असतील (याच्या पायाचा स्पर्श इच्छिलेले देणारा असेल).

**शब्दार्थ :-**

| | |
|---|---|
| अनुग्रह =कृपा | वंद्य= वंदनीय |
| परिस =स्पर्शमणि (मणिः = लोहचुंबक) | |
| चिंतामणि= इच्छिलेले देणारा कल्पित मणि | चरण= पाय |

## अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

**ओवी :** **ओवी क्रमांक १८**

**अष्टही सिद्धि याचे द्वारीं। वोळगत राहतील निरंतरीं।**
**नवनिधी याच्या घरीं। राहती ऐक द्विजोत्तमा॥ १८॥**

## गद्यरुप :-

आठ प्रकारच्या सिद्धि ह्याच्या दाराशी सतत सेवा करीत राहतील. नवनिधी संपत्ती याच्या घरी वास करतील, ब्राह्मणश्रेष्ठा हे (भविष्य) तू ऐक.

## शब्दार्थ :-

| | | |
|---|---|---|
| अष्ट सिद्धि=अणिमा सूक्ष्मपणा स्वतःच्या शरीराला इच्छेनुसार सूक्ष्मरुप देण्याची शक्ती,महिमा=हवे तितके मोठे होता येणे,गरिमा= स्वेच्छेप्रमाणे जड होण्याची शक्ति, लविमन्= वाटेल तितके हलके होणे,प्राप्ति =वाटेल ते मिळविण्याची शक्ति, प्राकाम्य =इच्छेप्रमाणे घडणे,ईशित्वं =प्रभुत्व आणि वशित्वं= वश करणे | | |
| वोळग= सेवा | निरंतर= सतत | द्विजोत्तमा= द्विज (ब्राह्मण) +उत्तम (श्रेष्ठ) |
| नवनिधी= कुबेराचे नऊ खजिने= पद्म, महापद्म, शंख, मकर, कच्छप, मुकुंद, नंद, नील, खर्व | | |

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

**ओवी :** **ओवी क्रमांक १९**

न होती यासी गृहिणी-सुत। पूज्य होईल त्रिभुवनांत।
याचे दर्शनमात्रें पतित। पुनीत होतील परियेसीं॥ १९ ॥

**गद्यरुप :-**

ह्याला पत्नी मुलबाळ नसतील. हा त्रिभुवनात पुजनीय होईल. ह्याच्या नुसत्या दर्शनाने, दुराचारी भ्रष्ट व्यक्ती शुद्ध झालेली तू ऐकशील.

**शब्दार्थ :-**

| | |
|---|---|
| गृहिणी= पत्नी= बायको | सुत= पुत्र = मुलगा |
| पतित= भ्रष्ट, दुराचारी | पुनीत= शुद्ध झालेला |
| परियसणे= ऐकणे | |

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

ओवी : ओवी क्रमांक २०

होईल हा अवतार-पुरुषी। आम्हां दिसतसे भरंवसी।
संदेह न धरावा मानसीं । म्हणोनि करिती नमस्कार॥ २०॥

**गद्यरुप :-**

हा मनुष्याच्या रुपातील अवतार होईल.आम्हाला (जन्मपत्रिकेतून) खात्रीने दिसत आहे, मनात कोणतीही शंका धरु नका. असे म्हणून त्यांनी (ज्योतिषांनी) नमस्कार केला.

**शब्दार्थ :-**

| | |
|---|---|
| पुरुष= नर, मनुष्य | भरंवसा (हिंदी भरोसा)= विश्वास (खात्री) |
| मानस=मन | संदेह =शंका |

## अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

**ओवी :** **ओवी क्रमांक २१**

**म्हणती समस्त द्विजवर। सांगती जनकासी उत्तर।**
**याचेनि महादैन्य हरे। भेणें नलगे कळिकाळा॥ २१ ॥**

**गद्यरुप :-**

सर्व ब्राह्मणश्रेष्ठ बोलू लागले. त्यांनी बालकाच्या पित्याला भविष्यकाळ सांगितला, याच्यामुळे महादैन्य निवारण होणार आहे (नाहीसे होणार आहे). कलियुगातील नाशकर्त्याला भिण्याचा संबध येत नाही.

**शब्दार्थ :-**

| | | |
|---|---|---|
| द्विजवर= द्विज (ब्राह्मण) + वर (श्रेष्ठ ) | | जनक=बाप (पिता) |
| उत्तर= पुढला, भविष्य काळ | म्हणणे= बोलणे | लग= संबंध |
| हरणे= निवारणे | भेणे =भिणे | कळि(कलियुग)काळ (नाशकर्ता) |

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

**ओवी :** **ओवी क्रमांक २२**

तुमचे मनीं जे जे वासना। सर्व साधेल निर्गुणा।
यातें करावें हो जतना। निधान आलें तुमचे घरा॥ २२॥

**गद्यरुप :-**

तुमच्या मनात ज्या ज्या वासना (पूर्ण न झालेल्या इच्छा) असतील, त्या सर्व वासना हा परमात्मा सिद्धिस नेईल (पूर्ण करेल). तुमच्या घरात (त्रिगुणातीत ब्रह्म हा) ठेवा (ह्या बालकाच्या रुपाने) आलेला आहे, त्याचे नीट जतन करा.

**शब्दार्थ :-**

| | |
|---|---|
| वासना =कर्मांचा मनावर राहणारा संस्कार (ठसा),इच्छा | जतन= जपणूक, निगा |
| निर्गुण= त्रिगुणातीत ब्रह्म, परमात्मा | निधान= ठेवा |
| साधणे =कार्य सिद्धीस नेणे | |

॥ श्रीगुरुचरित्र निधी॥

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

ओवी : ओवी क्रमांक २३

ऐसें जातक वर्तवोन। सांगता झाला विद्वज्जन।
जनक जननी संतोषोन। देती दान वस्त्राभरणें॥ २३ ॥

गद्यरुप :-

पत्रिका (जन्मकुंडली) मांडून (त्या ज्योतिष) जाणणाऱ्या लोकांनी असे सांगितले. माता-पित्याने समाधानाने, त्यांना (ज्योतिषांना) वस्त्र अलंकार दान दिले.

शब्दार्थ :-

| | |
|---|---|
| जातक= पत्रिका | वर्तविणे= चंद्र,ग्रह,तारे यांच्या गतीसंबंधाचे गणित करणे |
| विद्वज्जन= विद्वत् (विद्= जाणणे) + जन (लोक) | |
| जनक= बाप, पिता जननी= आई, माता | संतोष= समाधान |
| वस्त्राभरण =वस्त्र +आभरण (अलंकार) | |

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

**ओवी :** **ओवी क्रमांक २४**

सांगोनि गेले ब्राह्मणस्तोम। मातापिता अति प्रेम।
दृष्टि लागेल म्हणून विषम। निंबलोण वोंवाळिती॥ २४॥

## गद्यरुप :-

ब्राह्मण समूह त्या बालकाची स्तुती सांगून गेले. माता पित्यास बालकाविषयी अतिशय प्रेम दाटून आले. वाईट नजर लागेल म्हणून विषम असलेल्या लिंबू आणि मीठाने त्या बालकास माता पित्याने ओवाळले.

## शब्दार्थ :-

| | |
|---|---|
| स्तोम= समूह, स्तुती, | दृष्टि= वाईट नजर |
| विषम= तुल्य (समान) नसलेले | |

भावार्थ:- श्रीगुरुचरित्रकार लिंबू आणि मीठ ह्या गोष्टींनी दृष्ट काढण्याच्या क्रियेला विषम म्हणजे तुल्य नसलेले म्हणतात. याचा अर्थ वाईट इच्छांना घालविण्यास 'लिंबू व मीठ यांनी ओवाळणे' हा इलाज होऊ शकत नाही, हा संदेश श्रीगुरुचरित्रकारांनी दिलेला असावा.

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

**ओवी :** **ओवी क्रमांक २५**

व्यवस्था फांकली नगरांत। अभिनव आजि देखिलें म्हणत।
उपजतां बाळ ॐ कार जपत। आश्चर्य म्हणती सकळ जन॥ २५॥

**गद्यरुप :-**

"आज नवल पाहिले" असे म्हणत, ही बातमी व्यवस्था (योजनाबद्ध) केल्यासारखी ही नगरात पसरली. जन्मल्याबरोबर बाळाने 'ॐकार' जपला (उच्चारला), हे आश्चर्य आहे, असे सर्व लोक म्हणू लागले.

**शब्दार्थ :-**

| | |
|---|---|
| व्यवस्था= यथायोग्य योजना | फाकणे= फाकटणे= पसरणे |
| अभिनव= नवल | उपजणे= जन्मणे |
| सकळ= सर्व | जन= लोक |

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

**ओवी :** **ओवी क्रमांक २६**

**नगरलोक इष्ट मित्र। पहावया येती विचित्र।**
**दृष्टि लागेल म्हणोनि मात्र। माता न दाखवी कवणासी॥ २६॥**

**गद्यरुप :-**

शहरातील लोक तसेच प्रिय मित्र हे आश्चर्य पहावयास येत असत. केवळ (बाळाला) दृष्ट लागेल म्हणून आई (बाळ) कोणालाही दाखवत नसे.

**शब्दार्थ :-**

| | | |
|---|---|---|
| नगर=शहर | | इष्ट= प्रिय |
| विचित्र= आश्चर्य | मात्र =केवळ | कवण= कोण ? |

## ॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

### अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

**ओवी :** **ओवी क्रमांक २७**

**मायामोहें जनकजननी। बाळासी दृष्टि लागेल म्हणोनि।**
**अंगारा लाविती मंत्रोनि। रक्षा बांधिती कृष्णसुतें॥ २७॥**

**गद्यरुप :-** .

आई वडिलांच्या (बाळावर असलेल्या) वेड्याप्रेमामुळे बाळास दृष्ट लागेल म्हणून, बाळाचे माता पिता बाळाला मंत्रून अंगारा लावीत असत, मंतरलेला ताईत बाळाला **काळया** दोऱ्याने बांधित असत.

**शब्दार्थ :-**

| | | |
|---|---|---|
| माया= प्रेम | मोह= प्रेमाचे वेड | जनक= बाप पिता |
| जननी= आई माता | कृष्णसुत=कृष्ण (काळा) +सुत (दोरा) | |
| अंगारा= देवाचा प्रसाद म्हणून धूपारतीतील घेतलेली राख | | |
| रक्षा= मंत्राचा ताईत | | |

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

**ओवी :** **ओवी क्रमांक २८**

परमात्मयाचा अवतार। दृष्टि त्यासी केवीं संचार।
लौकिकधर्म ममत्कार। मातापिता संरक्षिती॥ २८॥

**गद्यरुप :-**

बालक परमात्म्याचा अवतार होते, त्याला दृष्ट लागण्याची बाधा कशी होईल ? व्यावहारिक न्यायाने आपले मुल, या आपलेपणाच्या भावनेतून, मातापिता बाळाचे संरक्षण करीत होते.

**शब्दार्थ :-**

| | | |
|---|---|---|
| केवी= कसे | संचार= बाधा | धर्म=व्यवहार |
| ममत्कार=मम(अस्मद्‌ची षष्ठी माझे)+ त् कार प्रत्यय<br>=ममत्कारः= आपलेपणा, स्वार्थ | | |

**ओवी :** **ओवी क्रमांक २९**

वर्ततां बाळ येणेंपरी। दिवस दहा झालियावरी।
नामकरण पुरःसरीं। ठेविता झाला जनक द्विजोत्तम॥२९॥

## गद्यरुप :-

अशाप्रकारे बाळाचे आगमन घडल्यावर, दहा दिवसांचे (बाळ) झाल्यावर; बाळाचे नाव ठेवण्याचा विधी करुन, शरीराबरोबर जाणारे (त्या देहाची ओळख सांगणारे) नाव ठेवून, जन्मदाता पिता असलेला, ब्राह्मणश्रेष्ठ (मोकळा) झाला.

## शब्दार्थ :-

| | | |
|---|---|---|
| वर्तणे= घडणे | येणे= आगमन करणे | परी= प्रकार |
| नामकरण= मुलाचे नाव ठेवण्याचा विधी | पुर्= शरीर | सर= जाणारे |
| जनक= जन्मदाता पिता | द्विजोत्तम= द्विज ब्राह्मण उत्तम श्रेष्ठ | |

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

**ओवी :** **ओवी क्रमांक ३०**

**‘शालग्रामदेव’ म्हणत। जन्मनाम झालें ख्यात।**
**नाम ‘नरहरी’ ऐसें म्हणत। उच्चार केला धर्मकर्में॥३०॥**

**गद्यरुप :-**

‘शालग्रामदेव’ म्हणून जन्मनाव प्रसिद्ध झाले. समाजाच्या चालीरितीनुसार, (व्यावहारिक नाव म्हणून )’नरहरी’ असे म्हणून (जन्मदात्या पित्याने) उच्चार केला.

**शब्दार्थ :-**

| | |
|---|---|
| ख्यात= प्रसिद्ध | धर्म = चाल (समाजाच्या चालीरिती) |
| कर्म= कर्म= करणे | |

***शालग्रामदेव शब्दार्थ : जिज्ञासुंनी शब्दार्थ चर्चा ह्या सदरात पहावा.***

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

**ओवी :** **ओवी क्रमांक ३१**

**ममत्व थोर बालकावरी। प्रतिपाळ करिती प्रीतिकरीं।**
**माता म्हणतसे येरी। न पुरे क्षीर बाळकासी ॥ ३१ ॥**

**गद्यरुप :-**

बालकावर पुष्कळ माया होती. बालकाशी प्रेमाने आचरण करीत असत. ती माता म्हणत असे, 'बालकाला दूध पुरत नाही'.

**शब्दार्थ :-**

| | | |
|---|---|---|
| ममत्व= माया प्रेम | थोर पुष्कळ | प्रीति = प्रेम |
| येर= तो | प्रतिपाळ= संरक्षण, आचरण | क्षीर= दूध |

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

**ओवी :** **ओवी क्रमांक ३२**

पतीसी म्हणे तये वेळां। स्तनीं दूध थोडें बाळा।
एखादी मिळवा कां अबळा। स्तनपान देववूं॥ ३२ ॥

**गद्यरुप :-**

त्यावेळी पतीला म्हणत असे, “स्तनातील दूध बाळासाठी थोडे आहे. एखादी स्त्री मिळविता का ? (जी स्तनपान बाळास देऊ शकेल) म्हणजे बाळास स्तनपान देता येईल.”

**शब्दार्थ :-**

| |
|---|
| अबला = स्त्री (काव्यात अबळा म्हटलेले असावे) |

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

**ओवी :** **ओवी क्रमांक ३३**

अथवा आणा मेषी एक। आपुले स्तनें न शमे भूक।
ऐकोनि हांसे बाळक। स्पर्श करी स्तनासि सव्यकर॥ ३३॥

**गद्यरुप :-**

किंवा एक मेंढी आणा. आपल्या (माझ्या) स्तनातील दूधाने बाळाची भूक शांत होत नाही (भागत नाही)". हे ऐकून (ते) बालक हसले. त्याने (बालकाने) आपल्या उजव्या हाताने स्तनाला स्पर्श केला.

**शब्दार्थ :-**

| | |
|---|---|
| मेष= मेंढ | शमणे= शांत होणे |
| सव्य= उजवा | कर =हात |

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

ओवी : ओवी क्रमांक ३४

स्तनीं स्पर्श होतांचि कर। बत्तीस धारा वाहे क्षीर।
वस्त्र भिजोनि विचित्र। वाहों लागे भूमीवरी॥ ३४॥

## गद्यरुप :-

(बाळाच्या) हाताचा स्तनास स्पर्श होताच, बत्तीस धारांनी दूध वाहू लागले. आश्चर्यकारक (रित्या मातेचे) वस्त्र भिजवून, (दूध) जमिनीवर वाहू लागले.

## शब्दार्थ :-

| | |
|---|---|
| कर= हात | क्षीर=दुध |
| विचित्र= आश्चर्यकारक | भूमी=जमिन |

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

**ओवी :** **ओवी क्रमांक ३५**

विस्मय करिती जनकजननी। प्रगट न करिती गौप्यगुणीं।
नमन करिती बाळकाचरणीं। माता होय खेळविती॥ ३५॥

**गद्यरुप :-**

पितामाता यांनी आश्चर्य व्यक्त केले. गुणवान बालकाचे गुपित प्रगट न करता, त्यांनी बालकाच्या चरणाला नमस्कार केला. माता बालकाला खेळवित होती.

**शब्दार्थ :-**

| | | |
|---|---|---|
| जनक= बाप / पिता | जननी= आई /माता | गौप्य= गुप्त गोष्ट |
| विस्मय=आश्चर्य | गुणी = गुणवान | |

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

**ओवी :** **ओवी क्रमांक ३६**

पाळण्या घालूनि बाळकासी। पर्यंदें गाय अति हर्षीं।
न राहे बाळक पाळणेसीं। सदा खेळे महीवरी॥ ३६ ॥

**गद्यरुप :-**

बालकाला पाळण्यात घालून, अतिशय आनंदाने (माता) अंगाई गीते गात असे. बालक पाळण्यात रहात नसे, ते नेहमी पृथ्वीवर (जमिनीवर) खेळत असे.

**शब्दार्थ :-**

| | | |
|---|---|---|
| पर्यंक= पलंग म्हणून पर्यंदे म्हणजे अंगाईगीते असा अर्थ असावा | | |
| हर्ष= अतिशय आनंद | मही= पृथ्वी | सदा= नेहमी |

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

**ओवी :** **ओवी क्रमांक ३७**

वर्धे बाळ येणेंपरी। मातापिता ह्न ममत्कारीं।
वर्धता झाला संवत्सरीं। न बोले कवणासवें॥ ३७॥

**गद्यरुप :-**

अशाप्रकारे मातापिता आणि त्यांच्या आपलेपणा, प्राप्त झालेला बालक वाढत होता. बालक वाढता वाढता एक वर्षांचा झाला. ते (बालक) कोणाबरोबर बोलत नसे.

**शब्दार्थ :-**

| | | |
|---|---|---|
| वर्धणे वाढणे | येणे= प्राप्त होणे | संवत्सर= वर्ष |
| ममत्कार=मम(अस्मद्‌ची षष्ठी माझे)+ त् कार प्रत्यय =ममत्कारः= आपलेपणा, स्वार्थ | | कवण= कोण<br>सवे=बरोबर |

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

**ओवी :** **ओवी क्रमांक ३८**

माता बोलवी कुमरासी। बोले शब्द ॐकारेसीं।
चिंता करीतसे मानसीं। मुकें होईल म्हणोनि॥ ३८॥

**गद्यरुप :-**

आई बाळाबरोबर बोलत असे,बालकाची वाणी ॐकार ह्याच शब्दाचा उच्चार करीत असे. बालक मुके होईल म्हणून माता मनात चिंता करीत असे.

**शब्दार्थ :-**

| | | |
|---|---|---|
| कुमर= बाळ | माता=आई | मानस=मन |
| बोल =तोंडच्या गप्पा, वाणी | | मुका =बोलता न येणारा |

**ओवी :** **ओवी क्रमांक ३९**

पुसती जाण ज्योतिष्यासी।म्हणे बोल नये काय यासी।
उपाय असेल विशेषी। म्हणोनि पुसे वेळोवेळीं॥ ३९ ॥

**गद्यरुप :-**

ओळखीच्या ज्योतिषांना विचारताना, म्हणत असत की याला वाणी का नाही? यावर काही विशेष उपाय असेल का? म्हणून वारंवार विचारत असत.

**शब्दार्थ :-**

| | | |
|---|---|---|
| पुसणे = विचारणे | जाण= ओळख | वेळोवेळी= वारंवार |

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

**ओवी :** **ओवी क्रमांक ४०**

सांगती जाण ज्योतिषी। आराधावें कुलदेवतेसी।
अर्कवारी अश्वत्थपर्णेसीं। अन्न घालावें तीनी वेळां॥४०॥

**गद्यरुप :-**

जाणकार ज्योतिषी सांगत कुलदेवतेची आराधना करावी. अर्कवारी पिंपळपानाचे तीनवेळा अन्न घालावे.

**शब्दार्थ :-**

| | | |
|---|---|---|
| जाण= जाणणारा | अर्क= सूर्य, औषधाचा द्रवरुप सत्त्वांश | |
| वारी= साठी | अश्वत्थपर्ण= पिंपळ पान | अन्न= भक्ष्य, खाद्य, खाण्यास योग्य |

अर्कवारी शब्दार्थ : जिज्ञासूंनी ‘ शब्दार्थ चर्चा ‘सदर पहावे.

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

**ओवी :** **ओवी क्रमांक ४१**

**एक म्हणती होईल मुकें। यासि शिकवावें बरव्या विवेकें।**
**बाळ बोल बोलूं शिके। म्हणोनि सांगती विनोदें॥ ४१ ॥**

**गद्यरुप :-**

काहीजण म्हणत, "बाळ मुके होईल, याला छानदार (व्यवस्थित) सारासार विचार करुन शिकवावे. बाळ बोल बोलू शकेल !" असे थट्टेने म्हणून सांगत असत.

**शब्दार्थ :-**

| | | |
|---|---|---|
| एक= काहीजण | बरवा= सुंदर, छानदार | विवेक=सारासार विचार |
| विनोद= थट्टा | | |

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

**ओवी :** **ओवी क्रमांक ४२**

हांसोनि ॐकार उच्चारी बाळ। आणिक नेणे बोल केवळ।
विस्मय करितातिं लोक सकळ। ॐकार शब्द ऐकोनि॥४२॥

**गद्यरुप :-**

बाळ हंसून ॐकार उच्चारी आणि फक्त ॐ हा शद्ब (उत्तरादाखल) पोहोचवित असे. ॐ कार शद्ब ऐकून, सगळे आश्चर्य करित असत.

**शब्दार्थ :-**

| | | | |
|---|---|---|---|
| नेणे= पोचविणे | बोल= शद्ब | विस्मय =आश्चर्य | सकळ= सर्व सगळे |

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

ओवी : ओवी क्रमांक ४३

एक म्हणती नवल झालें। सर्व ज्ञान असे भलें।

श्रवणीं ऐकतो बोल सकळ ।जाणूनि ना बोले कवण्या गुणें॥ ४३ ॥

**गद्यरुप :-**

काहीजण म्हणत हे तर नवल आहे, कानाने सर्व ज्ञान ऐकतो हे चांगले आहे ! सर्व शद्ब जाणूनही हा बाळ बोलत का नाही? कशामुळे बोलत नाही ?

**शब्दार्थ :-**

| | | |
|---|---|---|
| एक= काहीजण | भले =चांगले ! | श्रवण= कान |
| सकळ= सर्व | बोल= शद्ब | कवण्या गुणे = का ? कशामुळे ? |

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

**ओवी :** **ओवी क्रमांक ४४**

काहीं केलिया न बोले सुत। चिंता करिताति मातापिता।
पुत्रासी जाहलीं वर्षें सात। मुका झाला दैवयोगें॥ ४४ ॥

**गद्यरुप :-**

काही केल्या मुलगा बोलेना. मातापिता चिंता करु लागले. मुलाला सात वर्षे पूर्ण झाली. नशीबाने (मुलगा) मुका झाला.

**शब्दार्थ :-**

| | |
|---|---|
| सुत= पुत्र, मुलगा | झाली = बोली भाषेत जाहली |
| दैवयोग= दैवाची घटना (दैव= नशीब) | |

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

**ओवी :** **ओवी क्रमांक ४५**

सातवें वर्ष कुमरासी। योग्य झाला मुंजीसी।
पुसताति समस्त ब्राह्मणांसी। केवीं करावें म्हणोनियां ॥ ४५ ॥

**गद्यरुप :-**

बाळाचे सातवे वर्ष चालू असल्याने, मुंजीस योग्य झाल्याने, कसे करावे ? असे म्हणून मातापिता सर्व ब्राह्मणांना विचारु लागले.

**शब्दार्थ :-**

| | | |
|---|---|---|
| कुमर= बाळ | पुसणे =विचारणे | केवी= कसे |

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

**ओवी :** **ओवी क्रमांक ४६**

विप्र म्हणती तया वेळां। संस्कारावें ब्राह्मणकुळा।
उपनयनावें केवळा। अष्ट वरुषें होऊ नये॥ ४६ ॥

**गद्यरुप :-**

त्यावेळी ब्राह्मण म्हणाले,"ब्राह्मणकुळाचा संस्कार असलेली मुंज फक्त करावी. बाळ आठ वर्षांचा होऊ नये. (बाळ आठ वर्षांचा होण्या आधी मुंज करावी)."

**शब्दार्थ :-**

| | |
|---|---|
| विप्र= ब्राह्मण | संस्कार= चिन्ह, ठसा |
| उपनयन= मुंज | अष्ट= आठ |

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

**ओवी :** **ओवी क्रमांक ४७**

मातापिता चिंता करिती। उपदेशावें कवणे रीतीं।
मुका असे हा निश्चितीं। कैसें दैव झालें आम्हां॥ ४७॥

**गद्यरुप :-**

(मुंजीत पुत्राला गायत्री मंत्र पित्याने देण्याचा विधी असतो) गायत्री मंत्राचा उपदेश (आपल्या मुक्या मुलाला) कसा करायचा ? ही चिंता माता पिता करायला लागले. हा मुलगा निश्चित मुका आहे! आपले नशीब असे कसे झाले ?

**शब्दार्थ :-**

| | | |
|---|---|---|
| चिंता=काळजी | कवण= कोणता | दैव= नशीब |
| उपदेशः (संस्कृत) = मंत्र शिकविणे, आद्योच्चारण (आद्य + उच्चारण) | | |

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

**ओवी :** **ओवी क्रमांक ४८**

कैसें दैव जाहलें आपुलें। ईश्वरगौरी आराधिले।
त्रयोदशीं शिवासी पूजिलें। वायां झालें म्हणतसे॥ ४८ ॥

**गद्यरुप :-**

आपले दैव कसे झाले ? श्रीशंकरपार्वतीचे पूजन केले त्रयोदशीला शिवास (श्रीशंकरास) पूजिले. ही सर्व उपासना वाया झाली (गेली) असे ते मातापिता म्हणायला लागले.

**शब्दार्थ :-**

| | |
|---|---|
| ईश्वर=श्रीगुरुचरित्रात श्रीशंकरास 'ईश्वर' म्हटलेले आहे | |
| गौरी=पार्वती | आराधना= उपासना= पूजन |

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

**ओवी :** **ओवी क्रमांक ४९**

ईश्वरें तरि दिधला वरु। सुलक्षण झाला कुमरु।
न बोले आतां काय करुं। म्हणोनि चिंती शिवासी॥४९॥

**गद्यरुप :-**

श्रीशंकराने वर दिल्याने, बाळ सुलक्षण झाला (ॐकार शब्द उच्चार हे बाळाचे शुभ चिन्ह होय); तरी (बाळ) बोलत नाही, आता आम्ही काय करु ? असे म्हणून शिवाचे (श्रीशंकराचे) चिंतन करायला लागले.

**शब्दार्थ :-**

| | | |
|---|---|---|
| ईश्वर= श्रीगुरुचरित्रात श्रीशंकरास ईश्वर असे संबोधलेले आहे. | | |
| दिधणे= देणे | वर = देणगी, आशीर्वाद | सुलक्षणी = शुभ चिन्हे असलेला |
| कुमरु = बाळ | | |

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

**ओवी :** **ओवी क्रमांक ५०**

एकचि बाळ आमुचे कुशीं। आणिक न देखों स्वप्नेसीं ।
वेष्टिलों होतों आम्ही आशीं। आमुतें रक्षील म्हणोनि ॥ ५० ॥

**गद्यरुप :-**

आमच्या पोटी एकच बाळ (जन्मले), हे बाळ आमचे रक्षण करील म्हणून आशेने आम्ही वेढलेलो आहोत. आणखीन स्वप्न आम्ही पाहिलेली नाहीत.

**शब्दार्थ :-**

| |
|---|
| कुशी= कूस= उदर पोट |

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

ओवी : ओवी क्रमांक ५१

नव्हेच आमुचे मनींचा वास। पुत्र झाला निर्वाणवेष।
काय वर दिधला त्या महेशें। शनिप्रदोषीं पूजितां म्यां॥५१॥

**गद्यरुप :-**

पुत्र झाल्याचा आनंद,हे आमच्या मनात असलेल्या (पुत्रजन्माच्या) आनंदाचे सोंग नव्हे.(आमच्या मनात पुत्र झाल्याचा आनंद खरोखरच झालेला आहे). शनिप्रदोषी मी शंकराची पूजा केली, तरीही त्या महेशाने (श्रीशंकराने) असा काय वर दिला? (ह्या श्रीशंकराच्या वरामुळे मला मुका पुत्र झाला !).

शब्दार्थ :-

| | | |
|---|---|---|
| वास = राहणे | निर्वाण=आनंद | वेशः =वेष (सोंग) |

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

**ओवी :** **ओवी क्रमांक ५२**

ऐसें नानापरी देखा। जननी करी महादुःखा।
जवळी येवोनि बाळक। संबोखीत मातेसी॥५२॥

**गद्यरुप :-**

अशाप्रकारे आई नानाप्रकारे खूप दु:ख करताना दिसत होती. बाळ मातेच्या जवळ येऊन बाळ तिला समजावीत होते.

**शब्दार्थ :-**

| | |
|---|---|
| जननी= आई | महा= मोठा (खूप) |
| भावार्थ संबोखीत: -संबोधन उपदेश करणे ह्या शब्दाचे रुप संबोखीत असे श्रीगुरुचरित्रकारांनी तयार केलेले रुप असावे. कारण बाळ मुका असल्याने फक्त मातेच्या जवळ येऊन स्वतःच्या कृतीतून (मातेला बिलगून)आपल्या आईला समजावू शकतो. | |

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

ओवी : ओवी क्रमांक ५३

घरांत जाऊनि तये वेळां। घेऊनि आला लोखंड सबळा।
हातीं धरितांचि निर्मळा। झालें सुवर्ण बावन्नकशी ॥ ५३ ॥

**गद्यरुप :-**

त्यावेळी तो बाळ घरात जाऊन लोखंड घेऊन आला. बाळाने लोखंड हातात धरताच, बाळाच्या हाताचा परिणाम स्वच्छ दिसला; त्या लोखंडाचे अतिशय शुद्ध व उत्तम प्रतीचे सोने झाले.

शब्दार्थ :-

| | | |
|---|---|---|
| सबळ= औपाधिक =परिणाम | | निर्मळ =स्वच्छ |
| सुवर्ण= सोने | बावन्नकशी= बावनकशी = अतिशय शुद्ध व उत्तम (सोने) | |

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

**ओवी :** **ओवी क्रमांक ५४**

आणोंनि देतसे मातेसी। विस्मय करी बहुवसीं।
बोलावूनियां पतीसी। दाविती झाली तयेवेळीं॥५४॥

**गद्यरुप :-**

(बाळाने) मातेला आणून दिले, तिला खूप आश्चर्य वाटले. त्यावेळी तिने (मातेने) आपल्या पतीला बोलावून दाखविले.

**शब्दार्थ :-**

| | | |
|---|---|---|
| विस्मय= आश्चर्य | बहुवस= पुष्कळ | दाविणे= दाखविणे |

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

**ओवी :** **ओवी क्रमांक ५५**

गौप्य करिती तये वेळां। मंदिरांत नेलें तया बाळा।
पाहती त्याची बाळलीला। आणिक लोह हातीं देती॥५५॥

**गद्यरुप :-**

त्यावेळी त्यांनी ही गोष्ट गुप्त ठेवून त्या बाळाला मंदिरांत नेले. आणखीन लोखंड हातात देऊन, त्याची बाळलीला (हस्त स्पर्शाने लोखंडाचे सोन्यात होणारे रुपांतर करण्याचा बाळाचा गुण) पाहिली.

**शब्दार्थ :-**

| | |
|---|---|
| गौप्य =गुप्त गोष्ट | लीला= गुण |

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

**ओवी :** **ओवी क्रमांक ५६**

अमृतदृष्टी पाहतां स्वामी। समृद्धि झाली सर्व हेमीं।
विश्वास धरिती मनोधर्मी।होईल पुरुष कारणिक॥५६॥

**गद्यरुप :-**

स्वामींनी अमृतदृष्टीने पहाताच, सर्व सोन्याचे होऊन समृद्धि झाली. बाळाने (स्वामींनी) दाखविलेल्या गुणधर्मामुळे, 'हा मनुष्य घडविणारा होईल,' ह्यावर मनापासून विश्वास ठेवायला लागले.

**शब्दार्थ :-**

| | |
|---|---|
| हेम= सोने | धर्मी= गुणधर्मविशिष्ट |
| पुरुष= मनुष्य | कारणिक= घडवणारा |

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

ओवी : ओवी क्रमांक ५७

मग पुत्रातें आलिंगोनि। विनविताति जनकजननी।
तूं तारका शिरोमणि। कारणिक पुरुष कुळदीपका॥५७॥

**गद्यरुप :-**

मातापित्याने पुत्राला कवटाळून मग आर्जव केली की, “कुलदीपका, तू नक्षत्र आहेस. पुरुष घडविणारा नायक आहेस.”

**शब्दार्थ :-**

| | | |
|---|---|---|
| आलिंगणे = कवटाळणे (मिठी मारणे) | | विनवणे= आर्जव करणे |
| जनक =पिता, जननी= माता, आई | | तारका = नक्षत्र |
| शिरोमणि= नायक | पुरुष= मनुष्य | कारणिक= घडवणारा |

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

**ओवी :** **ओवी क्रमांक ५८**

तुझेनि सर्वस्व लाधलें। बोलतां आम्हीं नाहीं ऐकिलें।
अज्ञान -मायेनें वेष्टिलें। मुकें ऐसें म्हणों तुज॥५८॥

**गद्यरुप :-**

तुला (जीवनाचे) सार लाभलेले आहे. तुला बोलताना आम्ही ऐकले नाही. भ्रमात्मक ज्ञानाच्या भुरळीने आम्ही वेढलो गेल्याने, तुला मुका असे म्हणालो.

**शब्दार्थ :-**

| | | |
|---|---|---|
| सर्वस्व= सार | लाधणे= लाभणे | अज्ञान =भ्रमात्मक ज्ञान |
| माया= भुरळ | वेष्टणे= वेढणे | मुका= बोलता न येणारा |

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

ओवी : ओवी क्रमांक ५९

आमुचे मनींची वासना। तुवां पुरवावी नंदना।
तुझे बोबडे बोल आपणा। ऐकवावे पुत्रराया॥५९॥

**गद्यरुप :-**

हे नंदना (पुत्रा), आमच्या मनातील इच्छा तू पुरवावीस.
हे पुत्रराया, तुझे बोबडे बोल आम्हाला ऐकव.

**शब्दार्थ :-**

| | |
|---|---|
| नंदन= मुलगा | वासना= इच्छा |

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

**ओवी :** **ओवी क्रमांक ६०**

हास्यवदन करी बाळ। यज्ञोपवीत दावी गळां।
कटीं दावी मौंजीस्थळा। म्हणोनि दाखवी मातेसी॥ ६० ॥

**गद्यरुप :-**

बाळ (संमतीदर्शक) हसले. जानवे घालण्यासाठी गळा तसेच मुंज नावाचे कटिसूत्र बांधण्यासाठी कंबर ,बाळाने मातेला (खूणेने) दाखविली.

**शब्दार्थ :-**

| | | |
|---|---|---|
| वदन= मुख, तोंड | यज्ञोपवीत= जानवे | दावणे= दाखविणे |
| कटी=कंबर | मौंजी=मुंज नावाचे कटिसूत्र | म्हणोन= यासाठी |

**ओवी :** **ओवी क्रमांक ६१**

संज्ञा करोनि मातेसी। दावी बाळक संतोषीं।
मुंजी बांधितांचि आपणासी। येईल म्हणे बोल सकळ ॥ ६१ ॥

**गद्यरुप :-**

हाताने खूण करीत, अंगठा व तर्जनीच्या सहाय्याने बाळाने मातेला सांगितले की, आपली मुंज बांधताच (करताच) आपल्याला सगळे बोलता येईल.

**शब्दार्थ :-**

| |
|---|
| संज्ञा= हात इ. नीं केलेली खूण |
| संतोष= अंगठा व तर्जनी (अंगठ्याजवळचे बोट) |

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

**ओवी :** **ओवी क्रमांक ६२**

मातापिता संतोषती। विद्वांस ज्योतिषी पाचारिती।
व्रतबंधमुहूर्त-लग्न पाहती। सर्व आयती करिते झाले॥ ६२ ॥

**गद्यरुप :-**

माता पिता आनंदित झाले. (त्यांनी) विद्वान ज्योतिषांना आमंत्रण दिले. व्रतबंध करण्यासाठी शुभ वेळ व त्यावेळी खगोलात उदय झालेली राशी व त्या राशीतला ज्योतिषशास्त्रदृष्ट्या असलेला काळ ज्योतिषांनी पाहिला. मातापित्यानी मुंजीसाठी लागणाऱ्या सर्व सामुग्रीची तयारी केली.

**शब्दार्थ :-**

| | |
|---|---|
| संतोषणे= आनंदणे | विद्वस् =जाणणारा,विद्वान |
| पाचारण= आमंत्रण | मुहूर्त= शुभ वेळ |
| लग्न= राशीचा उदय व त्याचा काळ | आयती = सामुग्रीची तयारी |

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

**ओवी :** **ओवी क्रमांक ६३**

केली आयती बहुतांपरी। रत्नखचित अळंकारीं।
मायामोहें प्रीतीकरीं। समारंभ करिताति॥ ६३ ॥

**गद्यरुप :-**

रत्नजडित अलंकार करुन, अनेक प्रकारे मुंजीच्या सामुग्रीची तयारी केली. मायामोहातून असलेल्या मुलावरील प्रेमाने मातापित्याने समारंभ केला.

**शब्दार्थ :-**

| | |
|---|---|
| आयती = सामुग्रीची तयारी | बहुत= अनेक |
| परी= प्रकार, रीत | माया=प्रेम + मोह=प्रेमाचे वेड |

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

**ओवी :** **ओवी क्रमांक ६४**

चतुर्वेदी ब्राह्मण येती। शाखापरत्वें वेद पढती।
इष्ट सोयरे दाईज गोत्री।समस्त आले तया भवना॥ ६४॥

**गद्यरुप :-**

चार वेद जाणणारे ब्राह्मण आले. त्यांनी आप आपल्या शाखांप्रमाणे वेद पठण (वाचन) केले. व्याहीमंडळी, भाऊबंद तसेच त्या पित्याच्या गोत्रातील लोक असे सर्व अपेक्षित लोक त्याच्या घरी आले.

**शब्दार्थ :-**

| | |
|---|---|
| चतुर्वेदी =चतुर्= चार+ वेदी= ज्ञाता (जाणणारा) | पढ= पठनं= वाचन |
| इष्ट= इच्छित, इच्छिलेले (अपेक्षित) | सोयरा= नात्याचा माणूस(व्याहीलोक) |
| सोयरगत= विवाहाच्या संबंधामुळे उत्पन्न झालेले नाते | गोत्र= कूळ |
| दाईज= वारसा हक्क असलेला (भाऊबंद ) | भवन =गृह (घर) |

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

**ओवी :** **ओवी क्रमांक ६५**

**नानापरिचे श्रृंगार।उभारिले मंडपाकार।**

**आनंद करीतसे द्विजवर। अपार द्रव्य वेंचीतसे॥६५॥**

**गद्यरुप :-**

नाना प्रकारे सजविलेले मांडव उभारलेले होते. ब्राह्मणश्रेष्ठाने खूप आनंद (व्यक्त) करीत अमर्याद धन खर्च केले.

**शब्दार्थ :-**

| | | |
|---|---|---|
| श्रृंगारः= सजणे | मंडप= मांडव | आकार= स्वरुप |
| द्विज =ब्राह्मण + वर= श्रेष्ठ | अपार =अमर्याद + द्रव्य= धन | वेंच= खर्च |

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

**ओवी :** **ओवी क्रमांक ६६**

नगरलोक विस्मय करिती। मूक पुत्रासी एवढी आयती।
द्विजा लागली असे भ्रांति। वृथा करितो द्रव्य आपुलें॥ ६६ ॥

**गद्यरुप :-**

मुक्या मुलासाठी एवढा (डाम)डौल पाहून, नगरातील लोक नवल करायला लागले. ब्राह्मणाला भूल पडल्यामुळे तो आपले द्रव्य व्यर्थ (खर्च) करीत आहे.

**शब्दार्थ :-**

| | | |
|---|---|---|
| विस्मय= नवल | मूक (संस्कृत विशेषण)= बोलता न येणारा | |
| आयती= डौल =अवडंबर | | द्विज=ब्राह्मण |
| भ्रांतिः (संस्कृत)= चूक, भूल | | वृथा= व्यर्थ |

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

**ओवी :** **ओवी क्रमांक ६७**

**इतुकें वेंचूनि पुत्रासी। व्रतबंध करील परियेसीं।**
**गायत्री केवीं उपदेशी। करील आचार कवणेपरी॥ ६७॥**

**गद्यरुप :-**

इतके (धन) खर्च करुन (ब्राह्मण आपल्या मुलाचा) व्रतबंध (मुंज) करील; हे ऐकलेले (खरे होईल). परंतु गायत्री मंत्र ब्राह्मण आपल्या मुलाला कसा शिकविणार? कोणत्या रितीने (ब्राह्मण आपल्या मुक्या मुलाकडून) गायत्री मंत्राचा प्रथम उच्चार करवून घेईल ?

**शब्दार्थ :-**

| | |
|---|---|
| वेच= खर्च | परियसणे= ऐकणे |
| केवी=कसे | उपदेशः= मंत्र शिकविणे ,आद्योचारण |

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

| | |
|---|---|
| आचार= रीत | कवण =कोणता |

ओवी : ओवी क्रमांक ६८

एक म्हणती हो कां भलतें। मिष्टान्न आम्हांसि मिळतें।
देकार देतील हिरण्य वस्त्रें। चाड नाहीं त्याचे मंत्रा ॥ ६८ ॥

**गद्यरुप :-**

आणि काहीजण म्हणाले आम्हाला पाहिजे तसे गोड अन्न मिळत आहे. कापड तसेच सोन आम्हाला दक्षिणा म्हणून देतील (मुंजीतल्या) मंत्राचे काय होते? (हे जाणून घेण्याची आम्हाला) गरज नाही.

**शब्दार्थ :-**

| | | |
|---|---|---|
| एक= काहीजण | भलते=पाहिजे तसे | का=आणि |
| हो अहो | मिष्टान्न=मिष्ट(गोड)+ अन्न | |

## अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

| | | |
|---|---|---|
| देकार = दक्षिणा | हिरण्य= सोने | चाड= गरज |

**ओवी :** **ओवी क्रमांक ६९**

**ऐसे नानापरीचे लोक। विचार करिती अनेक।**
**मातापित्या अत्यंत सुख। देवदेवक करिताति॥ ६९॥**

**गद्यरुप :-**

असे नाना प्रकारचे लोक ब्राह्मणाच्या मुक्या मुलाच्या मुंजीसंबंधी अनेक विचार करीत होते. मातापित्याने अत्यंत सुखाने देवदेवकाची स्थापना केली.

**शब्दार्थ :-**

| | |
|---|---|
| नानापरी= नाना (अनेक) + परी (प्रकार) | अनेक= एकाहून अधिक |
| देवदेवक=देवक= लग्न, मुंज इत्यादी कार्यसिद्धीसाठी स्थापलेली देवता | |

**ओवी :** **ओवी क्रमांक ७०**

**चौलकर्म येरे दिवसीं। भोजन चौलमणीसी।**

**पुनरभ्यंग करुनि हर्षीं। यज्ञोपवीत धारण केलें॥ ७० ॥**

**गद्यरुप :-**

दुसऱ्या दिवशी शेंडी ठेवण्याचा कार्यक्रम करुन (मुंजमुलाचे) भोजन झाले. पुन्हा मुंज मुलास तेल लावून (स्नान घातले). मुंज मुलाने अतिशय आनंदाने जानवे धारण केले (स्वतःच्या गळ्यात घातले).

**शब्दार्थ :-**

| | | |
|---|---|---|
| चौलकर्म=शेंडी ठेवण्याचा विधी+ कर्म(काम) | | येर= दुसरा |
| मणी =रत्न | पुनरभ्यंग= पुनर् (पुन्हा)+ अभ्यंग (स्नानापूर्वी तेल लावणे) | |

## अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

| | |
|---|---|
| हर्ष= अतिशय आनंद | यज्ञोपवीत= जानवे |

**ओवी :** **ओवी क्रमांक ७१**

**मंत्रपूर्वक यज्ञोपवीत ।धारण करविती द्विज समस्त।**
**सहभोजन करावया माता। घेऊनि गेली मंदिरांत॥ ७१ ॥**

**गद्यरुप :-**

प्रथम सर्व ब्राह्मणांनी मंत्र म्हणत, मुलाच्या अंगावर जानवे घातले. एकत्र जेवण करण्यासाठी (मुंजमुलास), आई घरात घेऊन गेली.

**शब्दार्थ :-**

| | | | |
|---|---|---|---|
| पूर्वक= पहिला | यज्ञोपवीत= जानवे | धारण =अंगावर घेणे | मंदिर=घर |
| द्विज= ब्राह्मण | समस्त= सर्व | सहभोजन= एकत्र भोजन | |

**ओवी :** **ओवी क्रमांक ७२**

भोजन करोनि मातेसवें। निरोप घे तो एकोभावें।
मुंजीबंधन असे करावें। म्हणोनि आला पित्याजवळी॥ ७२ ॥

**गद्यरुप :-**

मातेबरोबर भोजन करुन, मातेचा निरोप घेऊन, मुंजीबंधन असे करावे म्हणून; तो एक जीव (मुका मुलगा) आपल्या पित्याजवळ आला.

**शब्दार्थ :-**

| | |
|---|---|
| सवे=बरोबर | एकीभाव= एक जीव |

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

ओवी : ओवी क्रमांक ७३

गृह्योक्तमार्गें मौंजी देखा। बंधन केलें त्या बालका।
समुहूर्त आला तत्काळिका। मंत्रोपदेश करिता झाला॥ ७३ ॥

**गद्यरुप :-**

घराच्या प्रवेशद्वारात मुंज मुलगा दिसत होता. त्याला (मुंज) बंधन केलेले होते. सुमुहूर्त (मुंज करण्याचा मुहूर्त) आल्याबरोबर, तत्काळ (लगेच पित्याने) मंत्राचा उपदेश केला. (पित्याने गायत्री मंत्र पुत्रास शिकविला).

**शब्दार्थ :-**

गृह्योक्तमार्गें =गृह्य (घराचे)+ उक्त (सूचित)+ मार्गे

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

| |
|---|
| = घराच्या सूचित मार्गात = घराच्या प्रवेशद्वारात |

**ओवी :** **ओवी क्रमांक ७४**

**गायत्रीमंत्र अनुक्रमेसीं। उपदेश देती परियेसीं।**
**बाळ उच्चारी मनोमानसीं। व्यक्त न बोले कवणापुढें॥ ७४॥**

**गद्यरुप :-**

परंपरेने ऐकत आलेल्या, गायत्रीमंत्राचे ज्ञान (पित्याने) दिले. बाळाने मनातल्या मनांत (गायत्री मंत्राचा) उच्चार केला. कोणापुढे प्रगटपणे (गायत्री मंत्र बाळाने) म्हटला नाही.

**शब्दार्थ :-**

| | | |
|---|---|---|
| अनुक्रम= परंपरा | उपदेश=बोध= ज्ञान | परियसणे= ऐकणे |
| व्यक्त= प्रगट होणे, उघड | | कवण=कोण |

**ओवी :** **ओवी क्रमांक ७५**

**गायत्रीमंत्र कुमरासी होतां। भिक्षा घेऊन आली माता।**
**वस्त्रभूषणें रत्नखचिता।देती झाली तया वेळीं॥ ७५॥**

**गद्यरुप :-**

बाळाला गायत्रीमंत्राचा (उपदेश देऊन झाल्यावर); माता रत्नजडित अलंकार, वस्त्रे अशी भिक्षा घेऊन आली. (ही भिक्षा तिने) त्यावेळी (बाळाला) दिली.

**शब्दार्थ :-**

| | | |
|---|---|---|
| कुमर= बाळ | खचित=जडित | भूषण=अलंकार |

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

**ओवी :** **ओवी क्रमांक ७६**

पहिली भिक्षा घेऊनि करीं। आशीर्वचन देती नारी।
बाळ ऋग्वेद म्हणोन उच्चारी। आचारधर्में वर्ततसे॥ ७६ ॥

**गद्यरुप :-**

आपल्या हातात पहिली भिक्षा घेऊन, त्या स्त्रीने (मातेने बाळास) आशीर्वाद दिला. बाळाने 'ऋग्वेद' शब्द उच्चारला. शास्त्रविहित कर्मरीतीनुसार (बाळ) वागला.

**शब्दार्थ :-**

| | | | |
|---|---|---|---|
| आशीर्वचन= आशीर्वाद= तुझे कल्याण होवो अशा अर्थाचे बोलणे | | | |
| कर= हात | नारी= स्त्री | आचार= रीत | |
| धर्म= शास्त्रविहित कर्म | | | वर्तणे= वागणे |

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

**ओवी :** **ओवी क्रमांक ७७**

पहिली भिक्षा येणेंपरी। देती झाली प्रीतिकरीं।
'अग्निमीळे पुरोहितं' उच्चारी। ब्रह्मचारी तया वेळीं॥ ७७॥

**गद्यरुप :-**

अशाप्रकारे पहिली भिक्षा ती माता प्रेमाने बाळास देती झाली. त्यावेळी ब्रह्मचार्याने (बाळाने) 'अग्निमीळे पुरोहितं'असा उच्चार केला.

**शब्दार्थ :-**

| |
|---|
| प्रीति=प्रेम |
| अग्निं ईळे पुरोहितं यज्ञस्य देवं ऋत्विजं होतारं रत्नधातं ॥ १ ॥<br>हा ऋग्वेदाचा प्रथम श्लोक आहे. |

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

**ओवी :** **ओवी क्रमांक ७८**

दुसरी भिक्षा देतां माता।उच्चार केला यजुर्वेद' इषेत्वा'०।
लोक समस्त तटस्था। माथा तुकिती तये वेळीं॥७८॥

**गद्यरुप :-**

मातेने दुसरी भिक्षा दिल्यावर, बाळाने 'यजुर्वेद' इषेत्वा'० असा उच्चार केला. सर्व अलिप्त (आत्तापर्यंत बाळाच्या मुंजीबाबत उदासीन )असलेल्या लोकांनी, त्यावेळी आपले मस्तक डोलाविले.

**शब्दार्थ :-**

| | | |
|---|---|---|
| तटस्थ= अलिप्त | माथा= मस्तक | तुकविणे= डोलाविणे |
| यज्ञकर्मांच्या दृष्टीनें मंत्रब्राह्मणात्मक यजुर्वेदासच प्राधान्य दिलें जातें.<br>यजुर्वेदातील पहिल्या तेरा अनुवाकांत "इषेत्वा" ने आरंभ होणारे मंत्र आहेत. | | |

ओवी : ओवी क्रमांक ७९

तिसरी भिक्षा देतां माता। म्हणे सामवेद् पढे आतां।
'अग्न आयाहि०' गायन करीत। तीन्ही वेद् म्हणतसे॥ ७९ ॥

गद्यरुप :-

मातेने तिसरी भिक्षा देताच 'अग्न आयाहि०' असे गायन करीत, बाळ म्हणाले, “आता सामवेदाचे पठण करतो”.(अशाप्रकारे बाळ) तीन्ही वेद् म्हणाले (उच्चारले).

शब्दार्थ :-

| |
|---|
| पढणे (संस्कृत क्रियापद् पठ् पठनं= वाचन)= पठण करणे |
| सामवेदांत गायनरुपानें स्तोत्रमंत्राचा संग्रह केला आहे. |

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

ओवी : ओवी क्रमांक ८०

सभा समस्त विस्मय करी। पहाती हर्षनिर्भरीं।
मुकें बोले वेद चारी। म्हणती होईल कारणिक॥ ८० ॥

**गद्यरुप :-**

संपूर्ण सभा (उपस्थित लोक) नवल करायला लागली.अतिशय अतिशय आनंदाने (अत्यानंदाने) पहायला लागले. मुका मुलगा चारही वेद म्हणतो, (म्हणजे हा मुलगा) घडविणारा होणार आहे.

शब्दार्थ :-

| | | |
|---|---|---|
| विस्मय= नवल | हर्ष=अतिशय आनंद | निर्भर=अतिशय |
| कारणिक= घडविणारा | | |
| वेद चारी= अथर्ववेदाचा अंतर्भाव ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद ह्या तीन वेदांमध्ये आहे असे अथर्ववेदभाष्यांत सविस्तर प्रतिपादन आहे. | | |

**ओवी :** **ओवी क्रमांक ८१**

यांते म्हणों नये नर। होईल देवाचा अवतार।
म्हणोनि करिती नमस्कार। जगद्गुरु म्हणोनिया॥८१ ॥

**गद्यरुप :-**

किंवा मनुष्यास मार्ग दाखविणारा म्हणून देवाचा अवतार होईल, असे म्हणून बाळास जगद्‌गुरु असे म्हणून नमस्कार केला.

**शब्दार्थ :-**

| | | |
|---|---|---|
| या= किंवा अथवा | नय= मार्ग दाखविणारा | नर= मनुष्य |

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

ओवी : ओवी क्रमांक ८२

इतुक्यावरी तो बाळक। मातेसी म्हणतसे ऐक।
तुवां उपदेश केला एक। भिक्षा माग म्हणोनि ॥ ८२ ॥

गद्यरुप :-

इतके झाल्यावर तो बालक आपल्या आईला म्हणाला," भिक्षा माग म्हणून तू मला स्पष्ट उपदेश केलास".

शब्दार्थ :-

| | |
|---|---|
| माता = आई | एक= ठळक= स्पष्ट |

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

ओवी : ओवी क्रमांक ८३

नव्हती बोल तुझे मिथ्या। निर्धार राहिला माझिया चित्ता।
निरोप द्यावा आम्हां त्वरिता। जाऊं तीर्थें आचरावया ॥ ८३ ॥

गद्यरुप :-

"तुझे बोल (शब्द) असत्य (होणार) नाहीत. आमच्या मनाने तुझा उपदेश वर्तनात आणण्याचा निश्चय केलेला आहे, (तरी) त्वरित आम्हाला जाण्याविषयी आज्ञा द्यावी."

शब्दार्थ :-

| | |
|---|---|
| मिथ्या= खोटे= असत्य | निर्धार= निश्चय |
| चित्त= मन | निरोप= जाण्याविषयी आज्ञा |

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

| | |
|---|---|
| तीर्थ(संस्कृत)= उपदेश | आचरणे= वर्तनात आणणे |

**ओवी :** **ओवी क्रमांक ८४**

आम्हां आचार ब्रह्मचारी। भिक्षा करावी घरोघरीं।
वेदाभ्यास मनोहरी। करणे असे परियेसा॥८४॥

**गद्यरुप :-**

घरोघरी भिक्षा मागून मनोहर असलेला वेदाभ्यास करावा, असा आम्हा ब्रह्मचारी लोकांचे वर्तननियम आहे, हे ऐक.

**शब्दार्थ :-**

| | | |
|---|---|---|
| आचारः= वर्तन नियम | करणे= कृत्य | परियसणे= ऐकणे |
| ब्रह्मचारी=ब्रह्म व विश्व यांच्या ऐक्याचे ज्ञान मिळविणारा, सोडमुंज न झालेला ब्राह्मण | | |

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

ओवी : ओवी क्रमांक ८५

ऐकोनि पुत्राचें वचन। दुःखें दाटली अतिगहन।
बाष्प निघताति लोचनीं। आली मूर्च्छना तये वेळीं॥८५॥

**गद्यरुप :-**

पुत्राचे बोलणे ऐकून (त्याच्या आईला) अतिशय तीव्र दुःख दाटून आले. डोळ्यातून अश्रू निघायला लागून त्यावेळी (त्या मातेला) चक्कर आली.

**शब्दार्थ :-**

| | | |
|---|---|---|
| वचन= बोलणे | गहन (संस्कृत)= तीव्र | बाष्प =अश्रू |
| लोचन= नेत्र= डोळा | मूर्च्छना= मूर्च्छा, चक्कर | |

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

ओवी : ओवी क्रमांक ८६

निर्जीव होऊनि क्षणेक। करिती झाली महाशोक।
पुत्र माझा तूं रक्षक। म्हणोनि केली आशा बहु॥ ८६ ॥

**गद्यरुप :-**

एक क्षण अंगातले बळ नसल्यासारखी (त्राण=शक्ती संपल्यासारखी) होऊन, (बाळाची माता) मोठा शोक करायला लागली. माझा पुत्र असलेला तू माझा रक्षक होशील म्हणून मी खूप आशा केलेली आहे.

शब्दार्थ :-

| | |
|---|---|
| क्षणेक= क्षण (काळाचा सूक्ष्म अंश) + एक | महा= मोठा |

| | |
|---|---|
| निर्जीव= निःसत्व(सत्व= बळ) = बळ नसणे | बहु= खूप |

**ओवी :** **ओवी क्रमांक ८७**

आमुतें रक्षिसी म्हणोनि। होती आशा बहु मनीं।
न बोलसी आम्हांसवें याचि गुणीं। मुकें म्हणविसी आपणासी॥ ८७॥

**गद्यरुप :-**

आम्हाला सांभाळशील म्हणून आमच्या मनात खूप आशा होती. आमच्या बरोबर बोलत नव्हतास, याच तुझ्या गुणामुळे आपणाला (स्वतःला) तू मुका म्हणवून घेत होतास.

**शब्दार्थ :-**

| | | |
|---|---|---|
| बहु= खूप | रक्षणे= संभाळणे | सवे= बरोबर |

**ओवी :** **ओवी क्रमांक ८८**

न ऐकों कधीं तुझे बोल। आतां ऐकतां संतोष होईल।
ईश्वरपूजा आलें फळ। म्हणोनि विश्वास केला आम्हीं॥ ८८॥

**गद्यरुप :-**

तुझे बोल कधीच ऐकले नव्हते, आता ते ऐकायला मिळाल्यावर आम्हाला संतोष होईल. ईश्वर पूजेचे फळ म्हणून तुझा जन्म झाला, असा (ह्या गोष्टीवर) आम्ही विश्वास केला (ठेवला).

ओवी : ओवी क्रमांक ८९

ऐसें नानापरी देखा। पुत्रासी म्हणे ते बाळिका।
आलिंगोनि कुमारका। कृपा भाकी तयेवेळीं॥ ८९ ॥

गद्यरुप :-

त्या मुलाला आपल्या (स्वतःच्या) पुत्राला असे अनेक प्रकाराने म्हणताना, (ती माता) दिसत होती. त्यावेळी मुलाला मिठी मारुन आमच्यावर “कृपा (दया) कर” असे मुलाला सांगत होती

शब्दार्थ :-

| | | |
|---|---|---|
| नाना= अनेक | परी= प्रकारे | बाळक= मूल |
| आलिंगन= मिठी मारणे | कृपा= दया, मेहेरबानी | भाकणे= उच्चारणे |

**ओवी :** **ओवी क्रमांक ९०**

ऐकोनि मातेचें वचन। बाळक सांगे ब्रह्मज्ञान।
नको खेदवूं अंतःकरण। आम्हां करणें तेंचि असे॥ ९० ॥

**गद्यरुप :-**

आपल्या आईचे बोलणे ऐकून, बाळाने तिला शहाणपणाच्या गोष्टी सांगितल्या. आम्हाला तेच काम करायचे असल्याने, आमच्या अंतःकरणाला दुःखवू नकोस.

**शब्दार्थ :-**

| | |
|---|---|
| माता= आई | वचन= भाषण (बोलणे) |
| ब्रह्मज्ञान =शहाणपणाच्या गोष्टी | खेद= दुःख |

ओवी : ओवी क्रमांक ९१

तुतें आणखी पुत्र चारी। होतील माते निर्धारीं।
तुझी सेवा परोपरी। करितील मनोभावेसीं॥९१॥

**गद्यरुप :-**

आई, तुला आणखीन चार मुलगे निश्चित होतील. ही मुले तुझी सेवा श्रद्धेने, नानाप्रकारे करतील.

**शब्दार्थ :-**

| | | |
|---|---|---|
| निर्धारणे= निश्चित करणे | माता= आई | पुत्र= मुलगा |
| परोपरी= नानाप्रकारे | मनोभाव= श्रद्धा | |

**ओवी :** **ओवी क्रमांक ९२**

**तुवां आराधिला शंकर। जन्मांतरीं पूर्वापार॥**
**म्हणोनि मस्तकीं ठेविती कर। मग तिसी जहालें जातिस्मरण॥ ९२ ॥**

**गद्यरुप :-**

"पूर्वीच्या जन्मांत तू शंकर आराधिला होतास.(श्रीशंकराची आराधना केली होतीस)", असे म्हणून पुत्राने मातेच्या डोक्यावर हात ठेवल्यावर तिला पूर्व जन्माचे स्मरण झाले. (तिला स्वतःचा पूर्वीचा जन्म आठवला).

**शब्दार्थ :-**

| | | |
|---|---|---|
| जन्मांतर= अन्य जन्म | पूर्वापार= पूर्वीपासून | मस्तक= डोके |

## अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

| |
|---|
| जातिस्मर(संस्कृत)= जातिस्मरण= पूर्वजन्मीचे स्मरण असलेला |

**ओवी :** **ओवी क्रमांक ९३**

पूर्वजन्मींचा वृत्तांत। स्मरतां जाहली विस्मित ।
श्रीपादश्रीवल्लभ स्वरुपता। दिसतसे तो बाळक ॥९३॥

**गद्यरुप :-**

पूर्वजन्मीच्या वृतांताचे स्मरण झाल्यावर, ती आश्चर्यचकीत झाली ते बाळ तिला श्रीपादश्रीवल्लभ स्वरुपात दिसले.

**शब्दार्थ :-**

| | |
|---|---|
| वृत्तांत= इतिहास, हकीकत | विस्मित= आश्चर्य |

ओवी : ओवी क्रमांक ९४

देखोनि माता तये वेळां।नमन केलें चरणकमळां।
श्रीपाद उठवूनि अवलीळा। सांगती गौप्य अवधारीं॥ ॥९४॥

गद्यरुप :-

(श्रीपादवल्लभ स्वरुप बालक) पाहिल्यावर त्या मातेने त्यावेळी उठून त्यांच्या पायांशी नमन केले. श्रीपादांनी तिला उठवून सहजतेने निश्चयपूर्वक गुप्त गोष्ट सांगितली.

शब्दार्थ :-

| | | |
|---|---|---|
| अवलीळा =सहज, लीलेने | गौप्य =गुप्त गोष्ट | अवधारा= निश्चय करणे |

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

**ओवी :** **ओवी क्रमांक ९५**

ऐक माते ज्ञानवंती। हा बोल करीं वो गुप्ती।
आम्ही संन्यासी असों यति। अलिप्त असों संसारीं॥ ९५॥

**गद्यरुप :-**

हे ज्ञानी माते ऐक," अहो, ह्या शब्दांत निग्रह आहे. आम्ही संन्यासी असून यति आहोत. ह्या संसारांत आम्ही अलिप्त असतो."

**शब्दार्थ :-**

वंत = हा शब्द एखाद्या नामाला जोडून आला म्हणजे त्याचा अर्थ ज्याच्यापाशी आहे तो

ज्ञानवंती = ज्ञान असलेली

## अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

| | | |
|---|---|---|
| बोल= शब्द, वाणी | वो =अहो | गुप्तिः (संस्कृत)= निग्रह |
| यतिः (संस्कृत)= तपस्वी, संन्यासी, जितेंद्रिय | | |

**ओवी :** **ओवी क्रमांक ९६**

याचिकारणे आम्ही आतां। हिंडूं समस्त तीर्थां।
कारण असे पुढें बहुता। म्हणोनि निरोप मागती॥ ९६ ॥

**गद्यरुप :-**

याचकारणासाठी आम्ही आता सर्व तीर्थक्षेत्र हिंडणार आहोत. ह्याचा (ह्या हिंडण्यामागचा) पूढील हेतू पुष्कळ आहेत, असे म्हणून (तीर्थाटनास) जाण्यासाठी त्यांनी (मातेची) आज्ञा मागितली.

**शब्दार्थ :-**

| | |
|---|---|
| बहुत= पुष्कळ | निरोप= जाण्याविषयी आज्ञा |

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

ओवी : ओवी क्रमांक ९७

येणेंपरी जननियेसी। गुरुमूर्ति सांगे विनयेसीं।
पुनरपि विनवी पुत्रासी। ऐका श्रोते एकचित्तें ॥९७॥

**गद्यरुप :-**

अशाप्रकाराने गुरुमूर्तिंनी विनयानी आपल्या आईला सांगितले. त्या मातेने परत आपल्या मुलाला विनविलेले; हे श्रोते हो, एकचित्ताने ऐका.

**शब्दार्थ :-**

| |
|---|
| जननी= आई, माता |

**ओवी :** **ओवी क्रमांक ९८**

पुत्रासी विनवी तये वेळ। मांतें सोडूनि तुम्ही जरी जाल।
आणिक कधीं न देखों बाळ। केवीं वांचूं पुत्रराया॥ ९८॥

**गद्यरुप :-**

त्यावेळी त्या मातेने गुरुमूर्तिंना विनविले, " जर मला सोडून तुम्ही जाणार आणि मी कधीच बाळ पाहू शकणार नाही तर पूत्रराया, मी कसे जगू ?".

**शब्दार्थ :-**

| | |
|---|---|
| केवी= कसे | वाचणे= जगणे |

**ओवी :** **ओवी क्रमांक ९९**

धाकुटपणीं तुम्हां तापस। धर्मी कवण आहे हर्ष।
धर्मशास्त्रीं ख्याति सुरस। आश्रम चारी आचरावे॥ ९९॥

**गद्यरुप :-**

लहान वयातील तापस धर्मात तुम्हाला कोणता आनंद आहे ? धर्मशास्त्राची कीर्ती रसयुक्त आहे.(धर्मशास्त्रातून उत्कट होणारी अंतःकरणवृत्ती प्रसिद्ध आहे). (ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ व संन्यास हे) चार आश्रम आचरावे.

**शब्दार्थ :-**

## अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

| | |
|---|---|
| धाकुटा =धाकटा वयाने लहान | कवण=कोण |
| ख्याति= कीर्ती प्रसिद्ध | सुरस =रसयुक्त(रस=अंतःकरणवृत्तीचे उत्कट होणे) |

**ओवी :** **ओवी क्रमांक १००**

ब्रह्मचर्य वर्षें बारा। त्यावरी गृहस्थधर्म बरा।
मुख्य असे, वानप्रस्थ तदनंतरा। घडती पुण्यें अपरांपर॥ १००॥

**गद्यरुप :-**

ब्रह्मचर्य बारा वर्षे आचरावा त्यानंतर बरा (चांगला असलेला) गृहस्थाश्रम मुख्य आहे, त्यानंतर वानप्रस्थाश्रम. वानप्रस्थाश्रमात सत्कृत्याशी परकेपणा ठेवला तर नुकसान होते.

**शब्दार्थ :-**

| | | |
|---|---|---|
| घडती= नुकसान | पुण्य=सत्कृत्य | अपरांपरी= परकेपणा |

**ओवी :** **ओवी क्रमांक १०१**

मुख्य आश्रम असे गृहस्थ। आचरतां होय अतिसमर्थ।
मग संन्यास घ्यावा मुख्यार्थ।धर्मशास्त्र येणेंपरी॥ १०१ ॥

**गद्यरुप :-**

मुख्य आश्रम असलेला, गृहस्थ आश्रम आचरणात आणणे, अतिशय उपयुक्त असते. मग संन्यास घ्यावा, असा धर्मशास्त्राचा मुख्य अर्थ आहे.

**शब्दार्थ :-**

| | |
|---|---|
| समर्थ(संस्कृत)= सार्थ= उपयुक्त | मुख्यार्थ= मुख्य +अर्थ |
| येणे= जाणणे | परी= प्रकार |

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

संन्यास= काम्यकर्मत्याग, चौथा आश्रम (प्रपंचाचा त्याग)

सम्यक्+ न्यास = संन्यास

या मर्त्यलोकातील सर्व स्थावर आणि जंगम गोष्टींचा त्याग म्हणजे संन्यास.

**ओवी :** **ओवी क्रमांक १०२**

ब्रह्मचर्यमार्ग ऐका। पठण करावें वेदादिकां।
विवाह होतां गृहस्थें निका। पुत्रादिक लाधावे॥ १०२॥

**गद्यरुप :-**

ब्रह्मचर्य मार्ग आचरताना, वेद इत्यादिंचे पठण करावे. विवाह होताच, गृहस्थाश्रमास योग्य झालेल्या गृहस्थाने पुत्र (मुले) वगैरे मिळवावीत.

**शब्दार्थ :-**

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

| | |
|---|---|
| वेदादिक=प्रस्थानत्रयी म्हणजे तीन अक्षर वाङ्मयांचा अभ्यास. त्यात चार वेद, एकशे आठ उपनिषदे आणि श्रीमद् भगवद् गीता येतात. | निका= खरा योग्य |
| लाधणे= लाभणे, मिळणे | |

ओवी : ओवी क्रमांक १०३

यज्ञादिक कर्म साधोनियां। तदनंतर संन्यास करणें न्याया।
येणेंविधी संन्यास असे मुख्या। अग्राह्य संन्यास बाळपणीं॥ १०३ ॥

**गद्यरुप :-**

यज्ञ इत्यादि कर्म सिद्धीस नेल्यावर, त्यानंतर संन्यास (आश्रम प्राप्त करणे) न्यायाने आहे. असे धर्मनियमानुसार प्राप्त झाल्यावर संन्यास हे मुख्य कृत्य आहे. बाळपणी संन्यास घेणे योग्य नाही.

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

## शब्दार्थ :-

| | |
|---|---|
| साधणे= कार्य सिद्धीस नेणे | येणे=प्राप्त होणे |
| विधी=धर्मनियम | मुख्य (संस्कृत) = मुख्य कृत्य |
| अग्राह्य= अ + ग्राह्य (घेण्यास योग्य)= ग्राह्य घेण्यास योग्य नसलेला | |

**ओवी :** **ओवी क्रमांक १०४**

समस्त इंद्रियें संतुष्टवावीं। मनींची वासना पुरवावी ।
तदनंतर तपासी जावें। संन्यास घेतां मुख्य असे॥ १०४॥

## गद्यरुप :-

सर्व इंद्रिये संतुष्ट करावीत मनातील इच्छा पूर्ण कराव्यात. त्यानंतर तप करण्यासाठी जावे, हे संन्यास घेतल्यावर मुख्य कृत्य आहे.

## शब्दार्थ :-

| |
|---|
| इंद्रिय= ज्ञानाचे किंवा कर्मांचे साधन व मन; लिंग |

| | |
|---|---|
| वासना= इच्छा | मुख्य= मुख्य कृत्य |

**ओवी :** **ओवी क्रमांक १०५**

ऐकोनि मातेचें वचन। श्रीगुरु सांगती तत्त्वज्ञान।
ऐक नामधारका सुमन। म्हणोनि सांगे सिद्धमुनि॥ १०५॥

**गद्यरुप :-**

आईचे बोलणे ऐकल्यावर श्रीगुरुंनी तत्त्वज्ञान सांगितले. नामधारका, चांगल्या मनाने तू ऐक, असे म्हणून सिद्धमुनिंनी सांगितले.

**शब्दार्थ :-**

| |
|---|
| सुमन= सु (चांगले) + मन= चांगले मन |

**ओवी :** **ओवी क्रमांक १०६**

गंगाधराचा नंदन। विनवीतसे नमून।

तें परिसा श्रोते जन। श्रीगुरुचरित्र विस्तार॥ १०६ ॥

**गद्यरुप :-**

गंगाधराचा पुत्र नमून (विनयाने) विनवितो, तो श्रीगुरुचरित्र विस्तार श्रोते जन ऐका.

**शब्दार्थ :-**

| | |
|---|---|
| नंदन= पुत्र, मुलगा | परिसणे= ऐकणे |

अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

ओवी : ओवी क्रमांक १०७

पुढें वर्तलें अपूर्व ऐका। सिद्ध सांगे नामधारका।
महाराष्ट्रभाषें-करूनि टीका। सांगतसे सरस्वतीगंगाधर॥ १०७॥

**गद्यरुप :-**

पुढे घडलेले अपूर्व, सिद्ध (मुनि) नामधारकास सांगतो ते ऐका. महाराष्ट्र भाषेत (मराठीत) स्पष्टीकरण करुन सरस्वती गंगाधर सांगत आहे.

शब्दार्थ :-

## ॥ श्रीगुरुचरित्र निधी॥

### अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

| | |
|---|---|
| वर्तणे= घडणे | टीका= स्पष्टीकरण |

ओवी : ओवी संख्या १०७

इति श्रीगुरुचरित्रामृते परमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे श्रीगुरुनरहरिबाळचरित्रलीलावर्णनं नाम एकादशोऽध्यायः॥ ११ ॥ ॥ श्रीगुरुदत्तात्रेयार्पणमस्तु॥

॥ श्रीगुरुदेवदत्त॥

**गद्यरुप:-** अशाप्रकारे श्रीगुरुचरित्र अमृतातून, कल्पतरुप्रमाणे परमकथा असणाऱ्या, श्रीनृसिंहसरस्वती यांच्या उपआख्यानातून, सिद्ध(मुनी) व नामधारक यांच्या संवादातून, श्रीगुरुनरहरिबाळचरित्रलीलावर्णन नावाचा अकरावा अध्याय श्रीगुरुदत्तात्रेयाला अर्पण असो.

## अध्याय अकरावा (श्रीगुरुनरहरिबाळ चरित्र लीला वर्णन )

### शब्दार्थ :-

| |
|---|
| एकादश=अकरा |

॥ श्रीगुरुदेवदत्त ॥